(29)

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई विभाग,मुंबई.


जवाहर बालभवन, तळमजला नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी क्र.०२२/२३६३००८१/८६ फॅक्स क्र.२३६३००९०
ई-मेल-dd.mumbai@mahedu.gov.in, dydemumbai@yahoo.com


दिनांक:- 24-06-2020

क्र.शिउसं/माध्य-३/नाहप्र./२०२० / 5907

प्रति,

मा.अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
दालन क्र.४३२, चौथा मजला, मंत्रालय विस्तार भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

**विषय:-** नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.
शिवाई शिक्षण प्रसारक संस्था नाशिक संचलित तानसा ग्लोबल स्कूल घोणसई, ता. वाडा जि.पालघर

**संदर्भ :-** अध्यक्ष, शिवाई शिक्षण प्रसारक संस्था नाशिक यांचे दि.०७/०३/२०२० रोजीचें पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने शिवाई शिक्षण प्रसारक संस्था नाशिक संचलित तानसा ग्लोबल स्कूल घोणसई, ता. वाडा जि.पालघर या शाळेस इयत्ता १ ली ते १२ वी (सीबीएसई),मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर प्रस्तवाची तपासणी अहवाल खालीलप्रमाणे आहे.

१. शासन निर्णय दि.४ मार्च २०२० मधील परिशिष्ट- अ मध्ये अर्ज सादर केला आहे.
२. शिवाई शिक्षण प्रसारक संस्था नाशिक संचलित तानसा ग्लोबल स्कूल घोणसई, ता. वाडा जि.पालघर या शाळेस इयत्ता १ ली ते १२ वी (सीबीएसई), मंडळास संलग्नित होण्यासाठी शाळा सरु करणेबाबत संस्थेचा ठराव आहे.
३. शासनाकडून शाळेस परवानगी मिळालेल्या आदेशाची प्रत आहे.
४. इयत्ता १ ली ते ५ वी (सीबीएसई) अभ्यासक्रमांशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांना इयता १ ली ते ५ वी पर्यंतच्या वर्गांमध्ये इतिहास व भूगोल विषय राज्य शासनाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमानुसार शिकविणे बंधनकारक असल्याचे रु.१०० च्या टँप पेपरवर हमीपत्र सादर केले आहे.
५. इयत्ता १ ली ते १० वी (सीबीएसई) अभ्यासक्रमांशी संलग्नित शाळेमध्ये इयता १० वी पर्यंत मराठी भाषा शिकविण्यात येईल याबाबतचे पत्र रु.१०० च्या टँप पेपरवर हमीपत्र सादर केले आहे.
६. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणचा अधिकार अधिनियम,२००९ नुसार कलम १८ मधील शाळा मान्यता प्रमाणपत्र (नमूना नं.०२) सोबत जोडले आहे.

PRINCIPAL
TANSA GLOBAL SCHOOL
Ghonsai, Tal: Wada,
Dist: Palghar-421 312.

PRINCIPAL
TANSA GLOBAL SCHOOL
Ghonsai, Po: Met, Tal: Wada,
Dist: Palghar-421 312.

(30)

७. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ मधील तरतूदीनुसार पालक शिक्षक संघाची स्थापना केली आहे.

८. शाळेच्या जागेबाबत कागदपत्रे(भाडेकरार) सोबत जोडलेले आहे.

९. संस्थेच्या आर्थिक मालमत्तेची कागदपत्रे व मागील १२ महिन्यांची मासिक सरासरी शिल्लक दर्शविणारे बँक स्टेटमेंट सोबत जोडले आहेत.

१०. संस्थेच्या मागील ३ वर्षाचा लेखा परिक्षण ताळेबंद अहवाल सादर केले आहे.

११. शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहिती आहे.

१२. संस्था नोंदणी प्रमाणपत्र आहे.

१३. संस्थेची घटना सोबत जोडली आहे.

१४. मा. धर्मदाय आयुक्त यांनी मान्य केलेली संस्थेची परिशिष्ट ३ ची प्रत आहे.

१५. संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये वाद नसल्याचे वाद नसल्याबाबतचे रु. १०० च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र आहे.

१६. संस्थेबाबत कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ठ नसल्याबाबतचे रु. १०० च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र आहे.

१७. शाळेची इमारत व भौतिक सुविधांचे छायाचित्र आहेत.

१८. संस्थेने शाळेची इमारत सुरक्षित असल्याबाबतचे कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, जव्हार जि.पालघर यांचे पत्र सोबत जोडले आहे.

तरी वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने शिवाई शिक्षण प्रसारक संस्था नाशिक संचलित तानसा ग्लोबल स्कूल घोणसई, ता. वाडा जि.पालघर या शाळेस इयत्ता १ ली ते १२ वी (सीबीएसई), मंडळास संलग्नित करण्याबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रस्ताव शिफारशीसह सविनय सादर करीत आहे.

आपला विश्वासू,

( राजेंद्र अहिरे )
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग,मुंबई.

प्रत :-

अध्यक्ष, शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ,
साईप्रसाद, रो हाऊस नं.०४, उदय कॉलनी, सिडको नं.०४, नाशिक, जि.नाशिक.

PRINCIPAL
TANSA GLOBAL SCHOOL
Ghonsai, Tal: Wada,
Dist. Palghar-421 312.

PRINCIPAL
TANSA GLOBAL SCHOOL
Ghonsai, Po: Met, Tal: Wada,
Dist: Palghar-421 312.

G:\नाह-हरकत प्रमाणपत्र\tanasa globlel school.docx